सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतीगृहांकरीता भोजन पुरवठादारांची निवड करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीसीएच-२०१८/प्र.क्र.१००/शिक्षण -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक: ०६ मार्च, २०१९.

वाचा:-

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः क्र. बीसीएच-२०१५/ प्र.क्र. १४८/शिक्षण-२, दि. २० सप्टेंबर,२०१७.
२. आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/ शिक्षण/शावगृ/वसतीगृह भो.ठे./ई-निविदा/का-५ अ/२०१८-१९/पुणे /३८८२, ३८८३, ३८८४, ३८८५, ३८८६, ३८८७, ३८८८ दि.२८.१०.२०१८.
३. आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/ शिक्षण/शावगृ/वसतीगृह भो.ठे.सु.धा.प्रस्ताव/ई-निविदा /का-५ अ/२०१८-१९/४४७५,दि.१४.१२.२०१८.

प्रस्तावना:-

राज्यातील शासकीय वसतीगृहांतील भोजनाचा दर्जा चांगला राहावा म्हणुन शासकीय वसतीगृहांसाठी भोजन पुरवठादाराची निवड ई-निविदा प्रकीयेव्दारे करण्याचा निर्णय संदर्भीय शासन निर्णय दि.२० सप्टेंबर,२०१७ अन्वये घेण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने शासकीय वसतीगृहासाठी भोजन पुरवठादारांची निवड करण्यासाठी प्रादेशिक उप आयुक्त,समाजकल्याण यांचे स्तरावर ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आलेली आहे. ई-निविदा प्रक्रीयेव्दारे निम्नदर प्राप्त भोजन ठेकेदारांची निवड करण्याकरीता सर्व प्रादेशिक उप आयुक्त, समाजकल्याण यांनी याबाबतचे प्रस्ताव आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचेस्तरावरील राज्यस्तरीय खरेदी समितीच्या मान्यतेस्तव सादर केले होते. त्यानुसार आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचेस्तरावरील राज्यस्तरीय खरेदी समितीने या प्रस्तावाबाबत शिफारसी करुन सदर प्रस्ताव मा.मंत्री(सा.न्या.) यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समितीच्या मान्यतेस्तव आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचे संदर्भीय दि.२८.१०.२०१८ अन्वये सादर करण्यात आले होते. त्यानुषंगाने आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचेस्तरावरील राज्यस्तरीय खरेदी समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :-

राज्यातील शासकीय वसतीगृहांकरीता भोजन ठेकेदारांची निवड करण्यासाठी प्रादेशिक उप आयुक्त समाजकल्याण यांचे स्तरावर राबविण्यात आलेल्या निविदा प्रकीयेमध्ये निम्नदर प्राप्त भोजन पुरवठादाराची निवड करण्याकरीता आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचेस्तरावरील राज्यस्तरीय खरेदी समितीने शिफारास केलेल्या प्रस्तावाची दि. २७.११.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समितीने छाननी करुन ई-निविदेमध्ये निम्नदर असलेल्या भोजन पुरवठादारांची निवड केलेली असून, या बैठकीमध्ये निवड करण्यात आलेल्या भोजन पुरवठादारांस तसेच भोजन पुरवठादारास मंजूर करण्यात आलेल्या दरास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे. शासकीय वसतीगृहांसाठी राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग समितीने निवड केलेल्या भोजन पुरवठादारांची यादी व त्यांना मंजूर करण्यात आलेले दर याबाबतचे जोडपत्र-१ सोबत जोडले आहे.

२. भोजन पुरवठादारांना कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही प्रादेशिक उप आयुक्त यांचे अधिपत्याखालील सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी तात्काळ करावी तसेच संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी या पुरवठादारांसोबत तात्काळ करारनामा करावा. करारनामा करतांना निवेदेतील अटी व शर्ती विचारात घेऊन करारनाम्यात या अटी व शर्तीचा समावेश असेल याची दक्षता संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी घ्यावी.

३. ज्या जिल्हयामध्ये भोजन ठेक्यांसदंर्भात न्यायालयीन प्रकरण उपस्थितीत झालेले आहे अशा न्यायप्रविष्ठ प्रकरणासंदर्भात आदेश निर्गमित करण्यात येऊ नये, याबाबतची दक्षता संबधित प्रादेशिक उप आयुक्त,समाजकल्याण तसेच सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी घ्यावी. न्यायालयीन प्रकरणी मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण यांचेमार्फत शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१०१७४५१८८१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a473 56798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.03.10 17:46:47 +05'30'

(अ.कों.अहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग (सर्व)
३. मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव.
५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,यांचे स्वीय सहायक
६. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण (सर्व)
७. निवड नस्ती (शिक्षण-२)